नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/०३/२०२६ (मंगळवार)

---

## एसबीएल स्फोट – डिएनए अहवाल, मृतदेह सुपुर्दगी बाबत....

पोलीस स्टेशन कळमेश्वर :– दिनांक ०१/०३/२०२६ रोजी **एसबीएल एनर्जी लिमिटेड, या कंपनीत झालेल्या** स्फोटत १९ जणांचा मृत्यु झाला असुन २३ जण जखमी आहेत.

सदर दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या १८ मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी तात्काळ त्यांचे नातेवाईकांचे डिएनए नमुने घेवुन डिएनए चाचणी करून अहवाल प्राप्त करण्यात आले. एका जखमीचा उपचारादरम्यान मृत्यु झाला होता. त्यांची ओळख पटलेली होती. काल दिनांक ०२/०३/२०२६ पासुन आज दिनांक ०३/०३/२०२६ रोजी चे सकाळपर्यंत सर्व १९ मृतदेह त्यांच्या नातेवाईकांना सुपुर्द करण्यात आले आहे. सुपुर्द केलेल्या सर्व १९ मृत व्यक्तींचे अंत्यसंस्कार शांततेत, कोणताही अनुचीत प्रकार न घडता पार पडले आहे.

# नागपूर ग्रामीण जिल्हयात ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह बाबत राबविण्यात येत आहे विशेष मोहीम

# ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह च्या एकुण १६१ कारवाईची नोंद

होळी / धुलीवंदन सण असल्याने बरेच लोक मदयपान करून नशेत वाहन चालवित असतात. त्यामुळे होणाऱ्या अपघातांना आळा बसावा यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने नागपुर ग्रामीण जिहयातील सर्व पोलीस स्टेशन, जिल्हा वाहतूक शाखा यांच्या वतीने मुख्य मार्ग, महामार्ग आणि मुख्य चौकांत मद्यपी वाहन चालकांना आवर घालण्यासाठी ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह कारवाई बाबत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. **सदर मोहीमेअंतर्गत दिनांक ०२/०३/२०२६ रोजी एकूण ५६ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस आणि दिनांक ०३/०३/२०२६ रोजी एकूण १०५ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस अशा एकुण १६१ केसेस करण्यात आल्या आहेत.**

उपरोक्त दारूचे सेवन करून वाहन चालक मिळून आल्याने त्यांच्यावर मोटार वाहन कायदा कलम १८५, १८४, १३०, २०७ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. संपुर्ण जिल्हयातील नागरिकांनी वाहन चालवितांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे ,मद्यप्राशन करून वाहन चालवू नये आणि अपघातास बळी पडू नये असे आव्हान नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

# स्वस्त्यात सोने देतो म्हणून तसेच स्वत:चे खोटे नाव सांगुन १७ लाखाची फसवणूक करणारा आरोपी अटक, संपुर्ण मुद्देमाल जप्त , स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक २४/०२/२०२६ रोजी फिर्यादी राजु जयसिंग साठिया, वय ३६ वर्ष, रा. गोंडखैरी कार्ली शिवार यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे तक्रार दिली की, फिर्यादी यास स्वस्तात सोने देतो असे म्हणुन कर्नाटक येथील आरोपी नामे कृष्णा कुंभारे, वय ३० वर्ष, रा. विजयपुर, कर्नाटक याने फिर्यादीची १७,००,०००/—रूपयांची फसवणूक केली. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे. कळमेश्वर पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयात समांतर तपासादरम्यान संशयित आरोपीचे शोधकामी मा. पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे परवानगीने राज्य कर्नाटक येथे रवाना होऊन संशयित अनोळखी आरोपीचा गोपनीय बातमीदाराचे तसेच स्थानिक पोलिसांचे मदतीने शोध घेतला. गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, संशयित आरोपीचे खरे नाव कृष्णा कुंभारे नसून त्याचे नाव फकीरप्पा निलप्पा बेलूर, वय ३० वर्षे रा. कोनानतांबिगी, ता राणेबेन्नुर, जि. हावेरी, राज्य कर्नाटक असल्याचे माहिती प्राप्त झाली. पोलीस पथकाने आरोपीचा शोध घेऊन त्यास त्याच्या राहते परीसारातुन ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हयाबाबत विचारपूस केली असता आरोपीने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली.

पेलीसांनी पंचसमक्ष्ज्ञ आरोपीकडुन १) रोख रक्कम किमती १७,००,०००/— रुपये २) एक अँड्रॉइड मोबाईल किंमती १०,०००/— रुपये ३) तीन कीपॅड मोबाईल किंमती २,५००/— रुपये असा एकूण १७,१२,५००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **कळमेश्वर पोलीसांनी आरोपीला अटक केले आहे.**




# रेती तस्करी करणारा सराईत गुन्हेगार शुभम गुणवंत रडके याला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन भिवापूर :— पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत **आरोपी नामे शुभम गुणवंत रडके, वय २४ वर्ष, रा. मसाळा, दत्त मंदीर जवळ, मसाळा कामठी रोड, ता. कामठी जि. नागपूर** याचेवर नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैधरित्या विनापरवाना रेती चोरीचे अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. असे गुन्हे करून तो शासनाचा महसुल बुडवुन शासनाचे आर्थिक नुकसान करतो. तसेच पर्यावरणाला सुद्धा नुकसान पोहचवतो. नागपुर ग्रामीण पोलीसांनी वेळोवेळी कारवाई करून त्याचेवर गुन्हे नोंद करून त्याला अटक केले. तसेच त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा **शुभम गुणवंत रडके** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात भिवापूर पोलीसांकडुन एम.पी. डी.ए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक ०२/०३/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपुर यांनी नमुद आरोपीला १ वर्षा करीता स्थानबध्द करण्याचे आदेश पारीत केले आहे.

भिवापूर पोलीसांनी नमुद आरोपी नामे शुभम गुणवंत रडके, वय २४ वर्ष, रा. मसाळा, दत्त मंदीर जवळ, मसाळा कामठी रोड, ता. कामठी जि. नागपूर यास  आज दिनांक ०३/०३/२०२६ रोजी तात्काळ ताब्यात घेवुन त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.




शुभम गुणवंत रडके

# अवैधरित्या प्राणघातक शस्त्र बाळगणाऱ्या २ अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन.केळवद :— दिनांक ०३/०३/२०२६ रोजी केळवद पोलीस हे पोलीस स्टेशन केळवद समोर नाकाबंदी करीत असतांना छिंदवाडयाकडुन सावनेर कडे येणारी एक्सयुव्ही ५०० कार क्रमांक एम एच ३१ ईए ७६९० ही येताना दिसली. सदर वाहन थांबवुन पोलीसांनी वाहन चालकाला नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव राज प्रदीप कैथ्वास, वय ३५ वर्षे, रा वायुसेना नगर, भिमसेना नगर, भिवशंकरीखोरी ढाबा, नागपुर तसेच वाहन चालकासह वाहनात हजर असलेला अश्विन विनोद धनविजय, वय ३९ वर्षे,रा प्लॉट नंबर ११४ , बुध्द विहाराजवळ , चंद्रमणी नगर, नागपुर अशी माहीती त्यांनी दिली. पोलीसांनी त्यांना अधिक विचारपुस केली असता त्यांचे वर्तन संशयास्पद वाटले. पोलीसांनी पंचासमक्ष एक्सयुव्ही ५०० कार क्रमांक एम एच ३१ ईए ७६९० वाहन आणि वाहनात असलेल्या दोन बॅग ची तपासणी केली असता दोन्ही बॅग मध्ये प्रत्येकी एक असे दोन सुरी सारखे धारदार शस्त्र मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहन आणि दोन्ही शस्त्र असा एकुण ५,०१,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केले

नमुद दोन्ही आरोपी हे प्राण घातक हत्यार बाळगुन मिळुन आल्याने आरोपी क्रं १) राज प्रदीप कैथ्वास, वय ३५ वर्षे,रा वायुसेना नगर, भिमसेना नगर, भिवशंकरीखोरी ढाबा, नागपुर आणि २) अश्विन विनोद धनविजय, वय ३९ वर्षे,रा प्लॉट नंबर ११४ , बुध्द विहाराजवळ , चंद्रमणी नगर, नागपुर यांच्या विरूद्ध पोस्टे केळवद येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम ३७(१)(३) महाराष्ट्र पोलीस अधिनियम ,सहकलम ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक :— दिनांक ०२/०३/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा परसोडा, महाकाल दुध डेअरीच्या मागे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) गजानन फजितराव साठवणे, वय ४४ वर्ष, रा. परसोडा, ता. रामटेक, २) नरेंद्र रामचंद्र कामडी, वय ४२ वर्षे, रा. वार्ड क्र. ४ नगरधन, ता. रामटेक, जि. नागपुर ३) पिंटु रामदास चांदेकर, वय ४० वर्ष, रा. भोजापुर, ता. रामटेक, जि. नागपुर ४) प्रेम रूपचंद मारबते, वय ३५ वर्ष, रा. परसोडा, ता. रामटेक, जि. नागपुर ५) ओमसिंग नारायण उईके, वय ५४ वर्ष, रा. परसोडा, ता. रामटेक, जि. नागपुर ६) ज्ञानेश्वर सुखदेव पानतावणे, वय ५४ वर्ष, रा. पत्रई, ता. रामटेक, जि. नागपुर ७) कैलाश कृष्णा चव्हाण, वय ५४ वर्ष, रा. शितलवाडी, ता. रामटेक, जि. नागपुर** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ६,५५०/—रूपये असा एकुण ६५५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागुपर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात आली अवैध दारू कारवाई बाबत विशेष मोहीम,२८ आरोपीतांविरूद्ध २८ गुन्हे नोंद

आगामी सणोत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अवैध दारू बाबत विशेष मोहीम राबवुन दिनांक ०२/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा असा **एकुण ४६,६४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे गुरूदेव रामचंद्र ढेंगे, वय ४६ वर्षे, रा. वेलतुर, ता. कुही यांचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे प्रमित हरिचंद्र ढोक, वय

३७ वर्ष, रा. सिदधार्थ भिवापुर, ता. भिवापुर याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी क्र. १) विशाल श्रावणजी भाजीखाये, वय ५७ वर्ष, रा. लोहारीसावंगा, ता. नरखेड, जि. नागपूर २) राजेंद्र किसनाजी येडके, वय ३८ वर्ष, रा. भिष्णूर, ता. नरखेड, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी एक असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे भारत लक्ष्मण डुमरे, वय ५० वर्ष, रा. डिगडोह पांडे, ता. हिंगणा याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्र. १) रामजी काशीनाथ ठाकरे, वय ६५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०८, नरखेड २) रविंद्र भागवत धुर्वे, वय ३७ वर्षे, रा. माणिकवाडा, ता. नरखेड ३) दशरथ बारकु पाठे, वय ६२ वर्षे, रा. शेमडा, ता. नरखेड ४) महिला आरोपी ५) मनोहर तुळशीराम भलावी, रा. चौरखैरी, ता. नरखेड ६) संदीप पंजाब कुंभरे, वय ३३ वर्षे, रा. शेमडा, ता. नरखेड ७) दशरथ बारकु पाठे, वय ६२ वर्षे, रा. शेमडा, ता. नरखेड याचे वर प्रत्येकी एक असे ०७ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे अमदिप सिंह दलजित सिंह, वय ३८ वर्ष, रा. ह. मु. चिमनाझरी, मामा का ढाबा, ता. जि. नागपुर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी क्र. १) नामे नवसू गोपाळा महाजन, वय ३० वर्ष, रा. धवळपेठ, ता. जि. नागपूर २) सूरेश शेषराव थोटे, वय ३३ वर्ष, रा. तूरकमारी, ता. हिंगना, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी एक असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे देवराव आनंदराव तुपकर, वय ५८ वर्ष, रा. शिपाई कर्मचारी नगर परीषद मोहपा याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी क्र. १) नामे सुनील प्यारेलाल तुमडाम, वय ४५ वर्ष, रा. पेंढरई, ता. रामटेक २) गोविन्द हरिराम तुमडाम, वय ३५ वर्ष, रा. पेंढरई, ता. रामटेक ३) शामा नामदेव परतेती, वय ४८ वर्ष, रा. पवनी, ता. रामटेक यांचेवर प्रत्येकी एक असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी क्र. १) लक्ष्मण जगन माहूले, रा. हमलापूरी फाटा, नगरधन ता. रामटेक, जि. नागपुर २) गणेश रामकिशन टेकाम, वय ३५ वर्ष, रा. गुगुलडोह रामटेक, ता. रामटेक, जि. नागपुर ३) दिनेश झाडू परतेती, वय ३२ वर्ष, रा. फुलझारी, पिपरीया, ता. रामटेक जि ४) दिनेश लुबीन मुगरी, वय ४६ वर्ष, रा. मनसर माईन, वार्ड नं. १, ता. रामटेक, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी एक असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे महावीर मुरलीधर डेकाटे, वय ४३ वर्ष, रा. अरोली, ता. मौदा यांचेवर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी क्र. १) नामे निशात बब्बा यादव, वय ३८ वर्ष, रा. चांपा रिठी, ता. पारशिवनी २) श्रीराम नारायण टेकाम, वय ४४ वर्ष, रा. जुना गोंडेगाव, वस्ती कन्हान यांचेवर प्रत्येकी एक असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन**

**मौदा** येथे आरोपी नामे शिवशंकर उर्फ शिवा सुभाष धांडे, वय ३३ वर्ष, रा. पिपरी, ता. मौदा यांचेवर एक गुन्हा नोंद. अशा २८ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) २३२ लिटर मोहाफुल गावठी दारू, २) ४० लिटर रसायन सडवा, ३) २१७८० मिली देशी दारू असा एकुण ४६,६४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७७८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०३/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७७८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग** :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३१ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग** :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ६८ आरोपी, पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २६ आरोपी अशा एकुण १६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग** :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७८ आरोपी, पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७७८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.)**








मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने